# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/ Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २०५ /२०२३

विषय :— राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कला, वाणिज्य, विज्ञान व अभियांत्रिकी विद्याशाखेतील अभ्यासक्रमाचा आराखडा व प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम तयार करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याबाबत.......

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, परिपत्रक क्र. ९७/२०२३ व परिपत्रक क्र. १२१/२०२३ अन्वये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी अभ्यासक्रमांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून लागू करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर परिपत्रकासोबत श्रेयांक आराखडा देखील प्रसिध्द करण्यात आलेला आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या संलग्न महाविद्यालयात पदवी वर्गाच्या अभ्यासक्रम आराखडे, अभ्यासक्रम संरचना, मूल्यांकन पध्दती व प्रथमवर्षाचे अभ्यासक्रम तयार करून दि. ३० सप्टेंबर, २०२३ रोजी आयोजित मा. विद्यापरिषदेच्या सभेमध्ये अंतिम स्वरूप देऊन संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यतेने प्रसिध्द करावयाचे आहेत.

या अनुषंगाने कळविण्यात येते की, कला, वाणिज्य, विज्ञान व अभियांत्रिकी शाखेतील संबंधित अध्यापकांची कार्यशाळा त्या—त्या अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या व कला, वाणिज्य, विज्ञान व अभियांत्रिकी शाखेतील तदर्थ अभ्यास मंडळावर मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले अध्यक्ष ज्या विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालयात कार्यरत आहेत तेथे २ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान व अभियांत्रिकी शाखेतील अभ्यासमंडळ/तदर्थ अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांना विनंती करण्यात येते की, प्रथम वर्ष अभ्यासक्रम तयार करण्यासाठी त्यांच्या अभ्यास मंडळाशी संबंधित अध्यापकांची कमाल २ दिवसीय कार्यशाळा त्यांच्या महाविद्यालयात/ विद्यापीठ विभागात आयोजित करावी. सदर कार्यशाळेच्या खर्चासाठी कमाल रू. ३०,०००/— पर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती विद्यापीठाकडून करण्यात येईल.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा. क्र. :– सीबी/ 9004
दिनांक :– २१/०९/२०२३

21.9.23
(मनोहर कुंजीर)
सहायक कुलसचिव

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठीः–

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था
६. मा. अध्यक्ष, कला, वाणिज्य, विज्ञान व अभियांत्रिकी शाखेतील विविध अभ्यासमंडळे तथा तदर्थ अभ्यासमंडळे

व्ही. सी. टिपणी क्र. २२२८ दि. १३.९.२०२३